महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांकः अनुवि-४९२६/(३२/२६)/अर्थसंकल्प (१),

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय विस्तार भवन,
मुंबई - ४०० ०३२.
तारीख: १४ ऑगस्ट, २०२६

संदर्भ :-

१) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांकः अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि. ०९.०४.२०२६
२) शासन निर्णय क्र. अनुवि-४९२६/(३२/२६)/अर्थसंकल्प, दिनांक १० एप्रिल, २०२६
३) आदिवासी विकास विभाग, शा.नि. क्र. बीयुडी-२०२६/प्र.क्र.०४/का.६, दि. १५.०४.२०२६
४) शासन निर्णय क्र. अनुवि-४९२६/(३२/२६)/अर्थसंकल्प, दिनांक १५ एप्रिल, २०२६
५) शासन निर्णय क्र. अनुवि-४९२६/(३२/२६)/अर्थसंकल्प, दिनांक २४ एप्रिल, २०२६
६) आदिवासी विकास विभाग, शा.नि. क्र. बीयुडी-२०२६/प्र.क्र.०४/का.६, दि. २८.०४.२०२६
७) शासन निर्णय क्र. अनुवि-४९२६/(३२/२६)/अर्थसंकल्प, दिनांक ३० एप्रिल, २०२६
८) शासन निर्णय क्र. अनुवि-४९२६/(३२/२६)/अर्थसंकल्प, दिनांक ०५ मे, २०२६
९) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांकः अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि. ०७.०५.२०२६
१०) शासन निर्णय क्र. अनुवि-४९२६/(३२/२६)/अर्थसंकल्प, दिनांक ११ मे, २०२६
११) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शा.प.क्र. बीयुडी-२०२५/प्र.क्र.१०५/ अर्थसंकल्प, दि. १९.०५.२०२६
१२) आदिवासी विकास विभाग, शा.नि. क्र. बीयुडी-२०२६/प्र.क्र.६१/का.६, दि. १३.०५.२०२६
१३) शासन निर्णय क्र. अनुवि-४९२६/(३२/२६)/अर्थसंकल्प, दिनांक ०३ जून, २०२६
१४) शासन निर्णय क्र. अनुवि-४९२६/(३२/२६)/अर्थसंकल्प (१), दिनांक ०३ जून, २०२६
१५) शासन निर्णय क्र. अनुवि-४९२६/(३२/२६)/अर्थसंकल्प, दिनांक ११ जून, २०२६
१६) शासन निर्णय क्र. अनुवि-४९२६/(३२/२६)/अर्थसंकल्प (१), दिनांक ११ जून, २०२६
१७) शासन निर्णय क्र. अनुवि-४९२६/(३२/२६)/अर्थसंकल्प (२), दिनांक ११ जून, २०२६
१८) शासन निर्णय क्र. अनुवि-४९२६/(३२/२६)/अर्थसंकल्प, दिनांक २२ जून, २०२६
१९) शासन निर्णय क्र. अनुवि-४९२६/(३२/२६)/अर्थसंकल्प, दिनांक २९ जून, २०२६
२०) शासन निर्णय क्र. अनुवि-४९२६/(३२/२६)/अर्थसंकल्प (१), दिनांक २९ जून, २०२६
२१) शासन निर्णय क्र. अनुवि-४९२६/(३२/२६)/अर्थसंकल्प (२), दिनांक २९ जून, २०२६
२२) शासन निर्णय क्र. अनुवि-४९२६/(३२/२६)/अर्थसंकल्प, दिनांक १३ जुलै, २०२६
२३) शासन निर्णय क्र. अनुवि-४९२६/(३२/२६)/अर्थसंकल्प, दिनांक २१ जुलै, २०२६
२४) शासन निर्णय क्र. अनुवि-४९२६/(३२/२६)/अर्थसंकल्प, दिनांक १२ ऑगस्ट, २०२६
२५) शासन निर्णय क्र. अनुवि-४९२६/(३२/२६)/अर्थसंकल्प, दिनांक १३ ऑगस्ट, २०२६
२६) शासन निर्णय क्र. अनुवि-४९२६/(३२/२६)/अर्थसंकल्प, दिनांक १४ ऑगस्ट, २०२६
२७) शासन निर्णय क्र. समग्र-२०२६/प्र.क्र.२५० (ई-१८०२२७५)/एसडी-१, दि. १४.०८.२०२६
२८) शासन निर्णय क्र. समग्र-२०२६/प्र.क्र.२५० (ई-१८०२२७५)/एसडी-१, दि. १४.०८.२०२६

२९) शासन निर्णय क्र. समग्र-२०२६/प्र.क्र.२५० (ई-१८०२२७५)/एसडी-१, दि. १४.०८.२०२६

प्रस्तावना -

वित्त विभागाकडून अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर (BEAMS) प्राप्त झालेल्या अनुदानाचा निधी नियंत्रक अधिकारी (राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नीरोड, मुंबई) यांना वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षातील शालेय शिक्षण व क्रीडा विभागासाठी अर्थसंकल्पित झालेला व वित्त विभागाकडून BEAMS प्रणालीवर प्राप्त झालेला निधी पुढीलप्रमाणे नियंत्रक अधिकाऱ्यांच्या अधिनस्त ठेवण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे.

(रुपये हजारात)

अ.क्र.	लेखाशिर्ष	नियंत्रक अधिकारी	वितरीत अनुदान
	मागणी क्रमांक ई - २, २२०२ सर्वसाधारण शिक्षण		
१	२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०१ प्राथमिक शिक्षण, १०६ शिक्षक व इतर सेवा, (००) (०२) समग्र शिक्षा अभियान (सर्वसाधारण) (केंद्र हिस्सा ६० टक्के) (२२०२I६२१), ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर)	राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नीरोड, मुंबई	३७९६९३२
२	२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०१ प्राथमिक शिक्षण, १०६ शिक्षक व इतर सेवा, (००) (०२) समग्र शिक्षा अभियान (सर्वसाधारण) (केंद्र हिस्सा ६० टक्के) (२२०२I६२१), ३५-भांडवली मत्तेच्या निर्मितीकरिता अनुदान	राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नीरोड, मुंबई	१२४३५८
	मागणी क्रमांक एन-३, २२०२ सर्वसाधारण शिक्षण		
३	२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०१ प्राथमिक शिक्षण, ७८९, अनुसूचित जातीसाठी विशेष घटक योजना (०१) अनुसूचित जाती उपयोजना (०१) (०३) समग्र शिक्षा अभियान (केंद्र हिस्सा ६०%) (२२०२I७४६), ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर)	राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नीरोड, मुंबई	६३६३५५
४	२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०१ प्राथमिक शिक्षण, ७८९, अनुसूचित जातीसाठी विशेष घटक योजना (०१) अनुसूचित जाती उपयोजना (०१) (०३) समग्र शिक्षा अभियान (केंद्र हिस्सा ६०%) (२२०२I७४६), ३५-भांडवली मत्तेच्या निर्मितीकरिता अनुदान	राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नीरोड, मुंबई	२१६९८
	मागणी क्रमांक टी - ५, २२०२ सर्वसाधारण शिक्षण		
५	२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०१, प्राथमिक शिक्षण, ७९६, जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) जनजाती क्षेत्र उपयोजना (०१) (१०) समग्र शिक्षा अभियान (केंद्र हिस्सा ६०%) (२२०२I६४८), ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर)	राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नीरोड, मुंबई	५६६१५४

२. सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षात वित्त विभागाने बीम्स प्रणालीवर उपलब्ध करुन दिलेला उपरोक्त निधी / अनुदान खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून वितरीत करण्यात येत आहे :-

१) वित्त विभागाने शासकीय कर्मचाऱ्यांना अग्रिम मंजूर करण्यास्तव वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय / शासन परिपत्रक यामधील विहित सूचना / अटी तसेच मुंबई वित्तीय अधिनियम, १९५९ मधील परिशिष्ट-२६ मधील तरतूदी विचारात घेवून, संबंधितांना अनुज्ञेय असणाऱ्या किमान रक्कमेच्या मर्यादेतच घरबांधणी अग्रिम वितरीत करण्यात यावा. यात कोणतीही कसूर होणार नाही याची दक्षता संबंधित नियंत्रक अधिकारी यांनी घ्यावी.

२) दिनांक ०१.०५.२००१ रोजी किंवा त्यानंतर दोनपेक्षा अधिक अपत्ये असणाऱ्या अर्जदारास (दुसऱ्या वेळेस जुळया अपत्यांचा अपवाद वगळता) या अग्रिमाचा लाभ घेता येणार नाही.

३) ज्या उद्देशासाठी निधी / अनुदान मंजूर आहे त्या व्यतिरिक्त इतर उद्देशासाठी खर्च करता येणार नाही. तसेच इतर लेखाशिर्षाकडे वळती करता येणार नाही.

४) सदर खर्चाचा प्रगती अहवाल मासिक निधी विवरणपत्रानुसार नियंत्रक अधिकाऱ्यांनी दरमहा शासनास १० तारखेपर्यंत सादर करावा.

५) निधी वितरण करताना महाराष्ट्र अर्थसंकल्प नियम पुस्तिका व वित्तीय अधिकार नियम पुस्तिकेमध्ये उल्लेख केलेल्या नियमांचे पालन करावे. तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र. ३०/२०१३/विनियम, भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांतर्गत किंवा वेळोवेळी वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग-२ मधील अटी व शर्तीचे पालन करुन सक्षम प्राधिकाऱ्यांची मान्यता घेवून अनुदान अदा करावे.

६) पदनिर्मितीच्या अनुषंगाने वेतनावरील निधी वाटपाच्या संदर्भात आवश्यक तेथे उच्चस्तरीय सचिव समिती / मंत्रीमंडळ यांची मान्यता तसेच वित्त विभागाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने कार्यवाही झाल्याची खात्री करण्यात यावी.

७) खाजगी स्वंयसेवी संस्थांना अनुदान उपलब्ध करुन देताना वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-१, उपविभाग एक मधील अनुक्रमांक २७, नियम १४९ प्रमाणे सक्षम अधिकाऱ्याची मान्यता घेवून अनुदान अदा करावे.

८) ज्या तरतूदी वितरणासाठी प्रशासकीय मान्यता आदेशाची आवश्यकता आहे अशा तरतूदी वितरीत करताना भाग-१, उपविभाग-तीन, अनुक्रमांक-चार, नियम २७ (२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराप्रमाणे सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने आदेश निर्गमित झाल्यानंतर अनुदान वितरीत करावे.

९) जिल्हा परिषदांसाठीचे वेतनेत्तर अनुदान त्यांचे अनुदान निर्धारण झाल्याशिवाय वितरीत करु नये.

१०) नवीन खर्चाच्या अनुषंगाने नवीन बाब प्रस्तावाव्दारे तरतूद केलेल्या अनिवार्य व कार्यक्रम खर्चाच्या निधी वितरणाबाबत वित्त विभागाची मान्यता घेणे आवश्यक आहे.

११) विविध शासकीय / प्रशासकीय संस्थांना तसेच अनुदानित संस्थांना सहायक अनुदाने मंजूर करण्यापूर्वी त्यांचेकडून पूर्वी वितरीत केलेल्या अनुदानाच्या खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्रे विभागाने प्राप्त करावीत. यापूर्वी दिलेल्या अनुदानाचा विनियोग पूर्ण झाल्याशिवाय पुढील अनुदान वितरीत करण्यात येऊ नये. कोषागार अधिकाऱ्यांनी, सहायक अनुदानामधून निधी आहरित करण्यासाठी सादर

केलेल्या देयकासोबत संबंधित संस्थेचे लगतच्या मागील महिन्यातील बँक अकाऊंट स्टेटमेंट (Bank Account Statement) ची प्रत जोडलेली नसल्यास देयक पारित करु नये.

१२) शासनाव्दारे देण्यात येणारे वेतन अनुदान लाभार्थ्यांच्या बँक अकाऊंटमध्ये ECS व्दारे प्रदान करणे बंधनकारक राहील. कोणत्याही परिस्थितीत वेतन अनुदानाची रक्कम एकत्रितरीत्या व Offline पध्दतीने वितरीत करण्यात येऊ नये.

१३) स्थानिक स्वराज्य संस्था तसेच महामंडळे यांना अनुदान वितरीत करण्यापूर्वी सदर संस्थांकडून राज्य शासनास येणे असणाऱ्या रकमांचा आढावा घेण्यात यावा व त्या रकमा वसूल करुनच उर्वरीत अनुदान वितरीत करण्यात यावे. तसेच शासनाव्दारे सदर संस्थांना वितरीत केलेल्या अनुदानाचा विनियोग व अखर्चित रक्कम कुठे ठेवली आहे. याबाबतची तपशीलवार माहिती एकत्रित करण्यात यावी. सदर अखर्चित निधी बँकेमध्ये ठेवलेला असल्यास त्याचे बँक अकाऊंट स्टेटमेंट (Bank Account Statement) शासनास सादर करावे. एखाद्या कार्यक्रमावरील खर्चासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला निधी अखर्चित असल्यास त्याच प्रयोजनासाठी चालू वर्षी वित्त विभागाच्या अनुमतीशिवाय निधी वितरीत करु नये.

१४) वैयक्तिक लाभार्थ्यांच्या कार्यक्रमाअंतर्गतची लाभार्थ्यांची देयके आहरित करतांना लाभार्थ्यांची यादी निश्चित करुन योग्य त्या तपशिलासह देयकासोबत जोडल्याशिवाय वैयक्तिक लाभार्थ्यांची अनुदाने आहरित करण्यात येऊ नयेत. वैयक्तिक लाभार्थ्यांच्या योजना आधार क्रमांकाशी संलग्न करण्यात याव्यात व अनुदानाचे प्रदान इलेक्ट्रॉनिक्स क्लिअरन्स सिस्टीम (ECS) व्दारेच करण्यात यावे. तसेच, वैयक्तिक लाभाच्या योजना पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी करावयाच्या उपाययोजना यांसदर्भात वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०२२/प्र.क्र.२७/अर्थबळ, दिनांक ०८ जून, २०२२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली असल्याबाबत संबंधित विभागांनी खातरजमा करावी.

१५) शिष्यवृत्ती / शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती, वैयक्तिक लाभार्थी तसेच सवलतीपोटी दिलेले अनुदान इत्यादींची प्रदाने, इलेक्ट्रॉनिक्स क्लिअरन्स सिस्टीम (ECS) व्दारेच करण्यात यावे. अशा सर्व बाबी आधार क्रमांकाशी संलग्न करण्यात याव्यात.

१६) बांधकाम विषयक प्रस्तावासंदर्भात प्रशासकीय मान्यता / तांत्रिक मान्यता तसेच आवश्यक तेथे सचिव समितीची मान्यता प्राप्त करुन कामनिहाय निधी अर्थसंकल्पीत करणे आवश्यक आहे. नवीन कामांबाबत निधीच्या उपलब्धतेची खात्री केल्यांनतरच कामाची निविदा सूचना काढून कार्यारंभ आदेश देण्यात येवून काम सुरु करावे व आवश्यकतेप्रमाणे निधीचे वितरण करण्यात यावे. जुन्या कामांचा आढावा घेऊन ती प्राथम्याने पूर्ण करण्यात यावीत व हा निधी ठेव बांधकामाचे स्वरुपात सार्वजनिक बांधकाम विभागास प्रदान करु नये.

१७) केंद्र पुरस्कृत योजनांबात केंद्र शासनाने वितरीत केलेला निधी राज्याच्या एकत्रित निधीमध्ये जमा झाल्याची खात्री करण्याबाबत वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-१०१८/प्र.क्र.४६/अर्थोपाय, दिनांक ५ डिसेंबर, २०२३ मध्ये नमूद करण्यात आल्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

मागील वर्षामधील केंद्र शासनाचा निधी चालू वर्षी खर्च करावयाचा असल्यास त्यास आवश्यकतेप्रमाणे यथास्थिती नियोजन विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग व आदिवासी विकास विभाग तसेच वित्त विभागाची सहमती घेणे अनिवार्य राहील. केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत ज्या

विभागाचे SNA खाते सुरु आहे त्या विभागाने सदर निधी विहीत मुदतीत SNA खात्यात वर्ग करण्याबाबत दक्षता घ्यावी. तसेच केंद्र पुरस्कृत योजनांबाबतचा अर्थसंकल्पीत करण्यात आलेला केंद्र व राज्य हिश्श्याचा निधी इतरत्र वळविण्यात येऊ नये.

१८) बाह्य सहाय्यित प्रकल्पांतर्गत केंद्र शासनाकडून आगाऊ व प्रतिपूर्ती स्वरुपात प्राप्त होणाऱ्या तरतूदींसाठी बाह्य हिस्सा व राज्य हिस्सा निधी वितरीत करण्यापूर्वी खालील बाबींची खातरजमा करुन घेण्यात यावी.

अ) बाह्य सहाय्यित प्रकल्पांतर्गत वितरित केलेल्या रकमेची प्रतिपूर्ती वेळावेळी केंद्र शासनाकडून / संबंधित बाह्य सहाय्यित वित्तीय संस्थेकडून प्राप्त करुन घ्यावी.

ब) राज्य शासनांतर्गत ज्या महामंडळ / कंपनी /उपक्रम यांना कर्ज स्वरुपात निधी वितरित करण्यात आलेला / येत आहे, त्या कर्जाची मुद्दल व व्याजाची परतफेड ही संबंधित महामंडळ / कंपनी / उपक्रम यांचेकडून शासनास विहित वेळेत करण्यात येत आहे किंवा कसे याबाबतची खातरजमा करुन निधीचे वितरण करण्यात यावे.

१९) “शासकीय विभागाने करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची नियमपुस्तिका", उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने त्यांच्या क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दि. १ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये प्रसिध्द केली आहे. सदर शासन निर्णय व त्यासोबतच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे तसेच, सदर विभागाने तद्नंतर वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय / परिपत्रक यामधील सूचनांनुसार खरेदी प्रक्रीया पूर्ण करुन पुरवठादार निश्चित झाल्यानंतर तसेच मार्गदर्शक सूचनेतील अटींचे पालन करुन खरेदीची देयके कोषागारातून आहरित करण्यात यावीत. खरेदी विषयक धनादेश संबंधित पुरवठादाराच्याच नावाने व इलेक्ट्रॉनिक्स क्लिअरन्स सिस्टीमव्दारे (ECS) अदा करण्यात यावेत.

२०) अनेक वेळेला विभागांव्दारे संक्षिप्त देयकाव्दारे निधी खर्च करण्यात येतो. मात्र त्याचे तपशीलवार देयक सादर न केल्यामुळे लेखा आक्षेप येतात व अपहार संभवतात. तरी यापुढे विभागांनी ज्या लेखाशीर्षाखाली जुनी तपशीलवार देयके प्रलंबित असतील ती सादर केल्याशिवाय त्या लेखाशिर्षाखालील निधी वित्त विभागाच्या सहमतीशिवाय आहरित करु नये.

२१) विविध कारणांमुळे अखर्चित राहिलेला निधी विभागांनी त्यांच्या अधिनस्त महामंडळाकडे हस्तांतरीत करुन तांत्रिकदृष्टया खर्च झाल्याचे दाखविले जाते, ही एक प्रकारची अनियमितता आहे, याची विभागांनी नोंद घ्यावी. तसेच त्यांच्या अधिनस्त असलेला यापूर्वीचा अखर्चित निधी (स्वीय प्रपंजी खात्यातील / महामंडळाच्या खात्यातील वा इतर प्रकारे खर्च दर्शवून बाहेर ठेवण्यात आलेला) संपूर्णत: खर्च झाल्याशिवाय तरतुदी आहरीत वा वितरीत करु नयेत. याठिकाणी असेही निदर्शनास आणण्यात येते की, स्वीय प्रपंजी लेख्याखाली विभागांकडे बऱ्यांच मोठया प्रमाणावर निधी अखर्चित असल्याचे दिसून येते. सदर निधीचा ताळमेळ घालून व लेखा परिक्षण करुन निधी विहीत मुदतीत खर्च न झाल्यास तो शासनाच्या तिजोरीत परत करण्यात यावा. सदर अखर्चित निधी बँकेमध्ये ठेवलेला असल्यास त्याचे बँक अकाऊंट स्टेटमेंट (Bank Account Statement) शासनास सादर करावे.

२२) थकित देयकांच्या प्रदानासाठी खर्च करण्यात येणाऱ्या प्रकरणी खरेदी केलेले साहित्य प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचे व त्याचे लेखे सुयोग्यरित्या ठेवल्याची खात्री पटल्याशिवाय तो निधी आहरित करण्यात येऊ नये.

२३) संदर्भाधिन क्रमांक १ येथील वित्त विभागाचे शासन परिपत्रक दिनांक ०९ एप्रिल, २०२६ व दिनांक ०७ मे, २०२६ मध्ये नमूद सर्व अटी व शर्ती बरोबरच खर्च करताना राज्य शासनाची कार्य नियमावली, वित्तीय नियमावली, अर्थसंकल्पीय नियम पुस्तिकेतील तरतूदी व सर्व अटी / शर्तीचे पालन करणे आवश्यक राहील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका नियम १७ व नियम १४२, तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला मधील उपविभाग-एक नियम क्र. १४९ आणि वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०९ एप्रिल, २०२६ व दिनांक ०७ मे, २०२६ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८१४१५२१५२३०४९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MRUNALI RAMSURAM KATENGE

Digitally signed by MRUNALI RAMSURAM KATENGE
DN: c=IN, 2.5.4.97=OFN:GOVERNMENT OF MAHARASHTRA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SESD, 2.5.4.20=BED223000E6B8E964343B394B0E9F110D3E6A583ED69CC6DE8F88BBE19C0EAB7, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=CEBBC8D5BC4A21FCC121C7881089B41E87F17D5976EE55C84B57B10D1464ED30, cn=MRUNALI RAMSURAM KATENGE
Date: 2026.08.14 15:23:18 +05'30'

(मृणाली काटेंगे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव
२. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
३. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा / विधानपरिषद, मुंबई
५. मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६. मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
७. मा. विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य
८. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
९. मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव
१०. मा. मंत्री (शालेय शिक्षण / क्रीडा) यांचे स्वीय सहायक
११. मा. राज्यमंत्री (शालेय शिक्षण / क्रीडा) यांचे स्वीय सहायक
१२. प्रधान सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग) यांचे स्वीय सहायक
१३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र - १ / २, मुंबई / नागपूर
१४. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र - १ / २, मुंबई / नागपूर
१५. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१७. स्थानिक निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१८. वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे
१९. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२०. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे

२१. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नीरोड, मुंबई
२२. सहसचिव / उपसचिव (विद्यार्थी विकास / शाळा व्यवस्थापन / शिक्षक शिक्षकेतर / प्रशासन / समन्वय / अर्थसंकल्प / क्रीडा) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
२३. शिक्षण संचालक (माध्य. व उच्च माध्य. / प्राथमिक / प्रौढ व अल्पसंख्यांक / SCERT / महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद) महाराष्ट्र राज्य, पुणे
२४. अध्यक्ष, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, महाराष्ट्र राज्य, पुणे
२५. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे
२६. सर्व क्रीडा उपसंचालक
२७. सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी
२८. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
२९. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद
३०. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक / प्रौढ)
३१. सर्व अधिक्षक, वेतन पथक (प्राथमिक / माध्यमिक)
३२. वित्त विभाग (व्यय-५ / व्यय-९ / व्यय-१४ / अर्थसंकल्प - ८) मंत्रालय, मुंबई
३३. सर्व कार्यासने, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
३४. निवड नस्ती, कार्यासन अर्थसंकल्प, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.